नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/०४/२०२६ (शुक्रवार )

---

# १.३४० किलोग्रॅम गांजा, रोख रक्कमेसह ३१ हजार १४० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १६/०४/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदाराने माहीती दिली की, घुबडमेट, ता. काटोल येथे एका महीलेने तिच्या घरी अंमलीपदार्थ गांजाची विक्रीकरीता साठवणुक केली आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन महीला आरोपीच्या घरी धाड टाकली असता अरोपी नामे **गणेश दिनदयाळ शेंगाय्या, वय ३९ वर्षे रा. घुबडमेट,ता. काटोल, जि. नागपुर आणि त्याची आई महीला आरोपी ही मिळुन आली.** पंचासमक्ष आरोपीतांच्या घराची झडती घेतली असता वाळलेला गांजा, पाने, बिया तसेच देठांसह मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १.३४० किलोग्रॅम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमती २६,८००/—रुपये आणि रोख रक्कम ४,३४०/—रुपये असा एकुण ३१,१४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ८(क), २० (ब) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे.**




**कारावाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## क्रिकेट सट्टा / बेटिंग  लावुन जुगार खेळणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद नागपुर ग्रमीण पोलीसांची कामगिरी

नागपुर ग्रामीण पोलीसांनी दिनांक १५/०४/२०२६ रोजी इंडीयन प्रिमियर लिग Royal Challengers Bengaluru विरूध्द Lucknow Super Giants खेळल्या जाणाऱ्या क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल व्दारे बेटींग लावून हारजितचा जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करत दोन गुन्हे नोंद केले. **दोन्ही कारवाई एकुण ५,४५,७००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या पथकाची कामगिरी**

**पोलीस स्टेशन बेला :—** दिनांक १५/०२/२०२६ रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांचे  पथक अवैध धंदयावर कारवाई कामी नागपुर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना. पोलीस पथकाला गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन बेला हद्दीत किन्हाळमाकडी ते दहेली या रोडवर एक इसम त्याची पांढऱ्या रंगाची

स्विप्ट कार क्रमांक एम एच ४० सी एक्स ३२५४ या वाहनामध्ये बसुन इंडीयन प्रिमीयर लिग या सिरीजमधील Royal Challengers Bengaluru विरूध्द Lucknow Super Giants या सुरु असलेल्या क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे बेटींग लावून हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधरे नमुद पोलीस पथकाने घटनास्थळी धाड टाकली असता प्रफुल रविंद्र झाड, वय ३३वर्ष, रा. बेला ता. उमरेड जि. नागपुर हा किक्रेट बेटींग आयडी तयार करून क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे पैश्यांची देवाणघेवाण करुन बेटींग करतांना मिळून आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन ०१) रोख रक्कम २१०० /— रुपये ०२) पांढ—या रंगाची स्विप्ट कार क्र. एम.एच ४० सी.एक्स ३२५४ किमंती ५,००,००० /— रुपये ०३) रियल कंपनीचा मोबाईल ३,००० /— रुपये असा एकूण ५,०५,१००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**कन्हान पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक १५/०२/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीस पथकाला गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, सत्रापुर कन्हान येथे दोन इसम इंडीयन प्रिमीयर लिग या सिरीजमधील Royal Challengers Bengaluru विरूध्द Lucknow Super Giants या सुरु असलेल्या क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे बेटींग लावून हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधरे नमुद पोलीस पथकाने घटनास्थळी धाड टाकली असता **१) शेखर महल्ले रेड्डी, ४०वर्षे, रा. सत्रापुर कन्हान ता. पारशिवणी, जि. नागपूर आणि २) आदीत्य अपत्रा बुड्डुपी, वय १९ वर्ष, रा. लेबर कॉम्प सत्रापुर, कन्हान ता.पारशिवणी,जि. नागपूर** हे किक्रेट क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे पैश्यांची देवाणघेवाण करुन बेटींग करतांना मिळून आले तसेच त्यांच्याकडे एक रजिस्टर ज्यामध्ये बेटींग लावणाऱ्या ग्राहकाकडुन घेतलेले आकडे लिहलेले दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन १) रियलमी कंपनीचाा मोबाईल किंमत १५०००/— रूपये,२) व्हिवो कंपनीचा मोबाईल किंमत १५०००/— रूपये,३) इनफिनिक्स कंपनीचा मोबाईल किमत १०,०००/—रूपये, ४) इतर कागतपत्रे एक रजिस्टर किमत ७०**

/—रूपये, ५) रोख रक्कम ५३० /—रूपये एकुण किमत ४०,६००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी दोन्ही प्रकरणात आरोपी यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदयाअन्वये २ गुन्हे नोंदविण्यात आला आहे. दोन्ही कारवाई एकुण ५,४५,७००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांचे कारवाई पथक

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद,नरखेड पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १६/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी वडचिचोली ते सावरगाव रोडवर चोरखैरी फाटा येथे नाकाबंदी केली असता टाटा टिप्पर क्र. एम एच ४० सी डी ८८७९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी क्रं १.किशोर श्रावण खरोले, वय २६ वर्षे, रा.दावसा ता नरखेड हा मिळुन आला.** त्याच्या कडील परवान्याची तपासणी केली असता वाहनामध्ये परवान्यापेक्षा अतिरिक्त रेतीची वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले. चालक आरोपीला मध्य प्रदेश येथुन महाराष्ट्रात रेती गौणखनिज वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे परवाना नव्हता. वाहन मालकाचे नाव **आरोपी क्रं २ नितेश ज्ञानेश्वर बाबंळ, रा. रोहणा, ता. नरखेड** असे असल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष टाटा टिप्पर क्र. एम एच ४० सी डी ८८७९ आणि ७ ब्रास रेती असा एकुण किमती ४०,३५,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद चालक आणि मालक आरोपी विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



**कारावाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही येथे दिनांक २७/१०/२०२५ रोजी अप क्र ६२९/२०२५ कलम १३७(३) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी, वय १४ वर्षे हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा

तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १६/०४/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा गोपनिय माहीतीच्या आधारे पाचगाव पोलस स्टेशन हद्दीतुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १६/०४/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ दोडकी बसस्टॉप येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो होन्डा कंपनीचा मोटर सायकल क्र एम. एच ४० सिरीज खेडलेली ००१७ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. आरोपी रोहीदास ममराज राठोड, वय ३९ वर्ष, रा पुसागोंदी, ता काटोल ,हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) संत्रा देशी दारू गुलाबी कंपनीच्या ९० एमएल च्या ३८ बॉटल्स् आणि २) वाहन असा एकुण ३६,५२०/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**

ग